दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 23 जुलै 2026 | अंक क्र. 77 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# ना. पंकजाताई मुंडे यांनी मानले आभार ; परळीतील नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालयाला शासनाची १३ हेक्टर जमीन विनामूल्य


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयानंतर शासन आदेश निर्गमित



**मुंबई वृत्तसंस्था**

परळी येथे नव्याने होत असलेल्या पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय उभारण्यासाठी १३ हेक्टर शासकीय जमीन विनामूल्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून तसा शासन आदेश महसूल व वन विभागाने निर्गमित केला आहे. दरम्यान या निर्णयाबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

परळीच्या सर्व्हे क्रमांक ४७८ मधील १३ हेक्टर शासकीय जमीन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना 'भोगवटादार वर्ग-२' या अटीवर विनामूल्य व महसूलमुक्त स्वरूपात हस्तांतरित करण्यात येणार आहे. महसूल विभागाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४० तसेच संबंधित नियमांनुसार ही जमीन प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने या जमिनीच्या वापराबाबत काही महत्त्वपूर्ण अटी घातल्या आहेत. ताबा मिळाल्यानंतर तीन वर्षांच्या आत या जमिनीवर प्रस्तावित पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे काम प्रत्यक्ष सुरू करणे बंधनकारक राहील. तसेच ही जमीन केवळ पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठीच वापरता येईल. जमीन विक्री, हस्तांतरण, देणगी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी वापरण्यास परवानगी राहणार नाही. दरम्यान या शासन आदेशामुळे परळीतील नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय उभारण्यास आता मोकळीक मिळाली असून जागेचा प्रश्न सुटला आहे. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार पशुवैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतानाच पशुपालन क्षेत्राला सक्षम मनुष्यबळ मिळावे, हा या निर्णयामागील उद्देश आहे असे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.





## उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त परळीत अभिवादन

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय श्री अजित (दादा) पवार यांच्या जयंतीनिमित्त परळी वैजनाथ येथील लोकनेता संपर्क कार्यालयात परळी तालुका भाजपाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भाजपा प्रदेश सदस्य सतीश (भाऊ) मुंडे, तालुका अध्यक्ष राजेश गित्ते, तालुका उपाध्यक्ष सूर्यकांत मुंडे, वडगावचे सरपंच शिवाजी कुकर, सेलूचे सरपंच बाळासाहेब फड, कासारवाडीचे माजी सरपंच दशरथ (दादा) गुट्टे, मांडवा येथील भाजपा नेते कारभारी (भाऊ) मुंडे, भाजपा सचिव धनराज गित्ते, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा अध्यक्ष महादेव कंडूकटले, युवा नेते नागनाथ मुंडे, वाल्मिक (भाऊ) मुंडे, माऊली आंधळे, भाऊसाहेब गित्ते, राजेभाऊ भांगे, सुभाष फड, बूथ प्रमुख गोपाळ केंद्रे, अरुण जिनझुर्डे, सायराट गरड यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांनी स्व. अजित (दादा) पवार यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांना विनम्र अभिवादन केले.

## निर्भीड पत्रकार संघाच्या परळी तालुका अध्यक्षपदी बालाजी ढगे, उपाध्यक्षपदी कृष्णा सरवदे

**बीड (प्रतिनिधी)**



निर्भीड पत्रकार संघाच्या परळी तालुक्याच्या अध्यक्षपदी दै.बीड चौफेरचे संपादक बालाजी ढगे तसेच उपाध्यक्षपदी कृष्णा सरवदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीत ही निवड सर्वानुमते करण्यात आली.

संघाच्या संस्थापक अध्यक्षा रुचिता र. मलबारी यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती प्रक्रिया पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्ष देवेंद्र ढाका, जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके, जिल्हा उपाध्यक्ष अमरजी साळवे, ज्येष्ठ पत्रकार प्रचंड सोळंके, पृथ्वीराज निर्मळ, माजलगाव तालुकाध्यक्ष बाळासाहेब आडागळे, माजलगाव सोशल मीडिया तालुकाध्यक्ष बाळासाहेब फपाळ, किल्लेधारूर सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गोवर्धनजी बडे, माजलगाव पान २ वर

## माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन ; अंबाजोगाई तहसील कार्यालयाच्या जनमाहिती अधिकाऱ्यास २० हजारांचा दंड

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नागरिकाने मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करून न देणे, तसेच राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतरही माहिती न देत आयोगाकडे खुलासा सादर करण्यास टाळाटाळ केल्याप्रकरणी अंबाजोगाई तहसील कार्यालयातील संबंधित जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांच्यावर २० हजार रूपयांचा दंड ठोठावण्याचा आदेश राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी दिला आहे. राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर (राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर) यांनी हा आदेश पारित केला असून, दंडाची रक्कम संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातून वसूल करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, बीड यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे.

याबाबत प्राप्त अधिक माहिती अशी की, शहरातील मिलिंदनगर, अंबाजोगाई येथील सामाजिक कार्यकर्ते तथा अपीलार्थी अनिल हरीभाऊ समुद्रे यांनी १ जुलै २०२४ रोजी तहसील कार्यालय, अंबाजोगाई येथे माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत सहा स्वतंत्र माहिती अर्ज दाखल केले होते. मात्र अधिनियमात नमूद केलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी १५ डिसेंबर २०२५ रोजी झाली होती. त्यावेळी आयोगाने संबंधित जनमाहिती अधिकाऱ्याला माहिती न दिल्याबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. तसेच अर्जदाराला आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देशही दिले होते. मात्र आयोगाच्या आदेशानंतरही संबंधित अधिकाऱ्याने ना माहिती उपलब्ध करून दिली, ना आयोगासमोर कोणताही लेखी खुलासा सादर केला. त्यानंतर झालेल्या अंतिम सुनावणीत अपीलार्थी अनिल समुद्रे यांनी आयोगासमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून आयोगाच्या आदेशानंतरही माहिती मिळालेली नसल्याचे सांगितले व संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. उपलब्ध कागदपत्रे, सुनावणीतील नोंदी आणि संबंधित अधिकाऱ्याने खुलासा न सादर केल्याची बाब विचारात घेऊन आयोगाने संबंधित जनमाहिती अधिकाऱ्याने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याचा निष्कर्ष नोंदविला. तसेच आयोगाच्या आदेशांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून माहिती अधिकार कायद्याबाबत नकारात्मक भूमिका घेतल्याचे निरीक्षणही आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २०(१) तसेच कलम १९(८)(क) अन्वये संबंधित जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (तहसील कार्यालय, अंबाजोगाई) यांच्यावर रूपये २०,००० (अक्षरी – वीस हजार रूपये) इतकी शास्ती अंतिम करण्यात आली. आयोगाने जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणात माहिती न देण्यास जबाबदार असलेल्या जनमाहिती अधिकाऱ्यांची नांवे निश्चित करून संबंधितांच्या वेतनातून दंडाची रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच शासनाच्या निर्धारित लेखाशिर्षात ती रक्कम जमा करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. यासोबतच, अपीलार्थी अनिल समुद्रे यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करून देण्याबाबतचा आयोगाचा पूर्वीचा आदेश कायम ठेवण्यात आला आहे. राज्य माहिती आयोगाच्या या निर्णयामुळे माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती वेळेत देणे ही जनमाहिती अधिकाऱ्यांची वैधानिक जबाबदारी असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आयोग कठोर भूमिका घेत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# महाराष्ट्राच्या कामाचा माणूस गेला: माजी आमदार बाळासाहेब आजबे यांची अजितदादा पवार यांच्या जयंतीप्रसंगी भावूक श्रद्धांजली

## अजितदादांकडे महाराष्ट्राच्या विकासाचे व्हिजन होते: माजी आमदार भीमराव धोंडे

**आष्टी (प्रतिनिधी) :**

भल्या पहाटे उठून लोकांच्या कामाला सुरुवात करणारे अजितदादा पवार हे महाराष्ट्रातील खऱ्या अर्थाने 'कामाचे नेते' होते. कोणताही भेदभाव न करता त्यांनी नेहमी सर्वसामान्यांची कामे केली. आज त्यांच्या जयंतीच्या दिवशी त्यांना अभिवादन करण्याची दुर्दैवी वेळ आपल्यावर आली आहे, अशा अत्यंत भावूक शब्दांत आष्टी-पाटोदा विधानसभेचे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात माजी आमदार बाळासाहेब आजबे आणि माजी आमदार भीमराव धोंडे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आष्टी तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना बाळासाहेब आजबे म्हणाले की, "दादांसोबत काम करण्याची संधी मला मिळाली. त्यांच्या प्रत्येक कामाचे नियोजन, काटेकोरपणा आणि शिस्तबद्ध वेळापत्रक यामुळे ते सर्वांचे आवडते नेते होते. काम होणार असेल तर 'होईल' आणि नसेल होणार तर थेट 'नाही' सांगणारा त्यांचा स्पष्टवक्तेपणा सर्वांना ठाऊक होता. त्यांच्या स्पष्ट बोलण्यामुळे कधीही कुणी नाराज होत नव्हते, म्हणूनच जनता त्यांना कामाचा माणूस मानत असे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे."

,,यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, "अजितदादा पवार हे दूरदृष्टी असलेले नेते होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बांधणीसाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. त्यांच्या चातुर्य आणि योग्य नियोजनामुळेच पक्ष भक्कमपणे उभा राहिला. जेव्हा जेव्हा त्यांची भेट झाली, तेव्हा केवळ आणि केवळ विकासावरच चर्चा झाली. यावरून त्यांचा विकासात्मक दृष्टिकोन स्पष्ट होत असे."

तसेच, "पुढील काळात आपण राज्याच्या उपमुख्यमंत्री व पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाची कामे पुढे नेणार आहोत. आष्टी तालुक्यात अनेक ठिकाणी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची अडवणूक होत असून, या संदर्भात आपण लवकरच उपमुख्यमंत्री सुनेत्राताईंशी चर्चा करणार आहोत," असेही धोंडे यांनी यावेळी नमूद केले.



संपादकीय

# मरता, क्या नहीं करता?

**गेल्या विधानसभा निवडणुकांपासून एकत्र येणार होते, ते दोन भाऊ शुक्रवारी अधिकृतरीत्या एकत्र आले. राज्यात बऱ्याच काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विधानसभा निवडणुकीनंतर होणार हे उघड होतं. विधानसभा निवडणुकात हाती काही लागणार नाही, हे लक्षात आल्यानंतर निदान मुंबई महापालिकेसाठी तरी आपण एकत्र आलं पाहिजे, हे दोन्ही भावांना कळून चुकलं. अमित ठाकरे यांच्या माहीम मतदारसंघातील पराभवाने त्याला बळ पुरवलं. मूळ शिवसेनेने आधी मुंबई महापालिका जिंकली आणि त्यानंतर तिचा महाराष्ट्रात विस्तार झाला. त्यामुळे, कसंही करून मुंबई महापालिकेची निवडणूक प्रतिष्ठेने लढायलाच हवी; अन्यथा आपलं नांवच पुसलं जाईल, या भीतीने दोन्ही भाऊ एकत्र आले आहेत. त्यांच्या एकत्र येण्याचं वर्णन 'भीतीसंगम' असं करण्यात आलं आहे, ते शंभर टक्के खरंच आहे. ही स्थिती फक्त ठाकरे बंधूंची नाही, आधी विधानसभा आणि नंतर नगर परिषदा-नगरपंचायतींच्या निवडणुकीत भाजप-शिवसेनेचा जो झंझावात दिसला, त्यातून सर्वच विरोधी पक्षांची ही अवस्था झाली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्यापासून या गोंधळलेल्या पक्षांची जी पळापळ सुरू आहे, त्यातून निवडणुकीनंतर त्यांची स्थिती काय असेल, याचा अंदाज आताच आल्याशिवाय राहात नाही. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला तर आपण कुठे आहोत, कोणाबरोबर आणि कुठपर्यंत जाणार आहोत हेच कळेनासं झालं आहे. मुंबईत ठाकरे बंधूंनी नाकारल्यानंतर त्यांची आता काँग्रेसकडे 'घेता का बरोबर?' अशी विचारणा सुरू आहे. मुंबईबाहेर पुतणे अजित पवार यांच्यामार्फत त्यांनी महायुतीशी गुपचूप संधान बांधलं आहेच! काँग्रेसला नगरपालिका निवडणुकीत अपेक्षेपेक्षा बरं यश मिळालं असलं, तरी महापालिका निवडणुकीत काय होईल, याची कल्पना त्या पक्षात कोणालाच नाही. त्या पक्षाचे जिल्हावार नेते अधांतरी लटकत असल्यासारखी विधानं करताहेत ती त्यामुळेच. पदामुळे राज्य पातळीवरचे नेते झालेल्या प्रदेशाध्यक्षांचा आणि या नेत्यांचा संवाद अशक्य आहे. त्या पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आणि मतदार काय करतील, यावर त्यांचं निवडणुकीतलं भवितव्य अवलंबून आहे. अशा बेभरवशाच्या, कोणतीही शाश्वती नसलेल्या, 'लॉटरी'सम यशासाठीही उबाठाचे शक्यते सगळे प्रयत्न करून झाले. 'मनसेसह आपली आघाडी शक्य नाही' असं काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी सुनावल्यानंतरच ते थोडे थंड पडले. अन्यथा,' मरता, क्या नहीं करता?' या न्यायाने जमेल तिथून ताकद मिळवण्याचे उबाठाचे प्रयत्न सुरूच आहेत. कारण, त्याशिवाय निवडणुकीत आपला निभाव लागणार नाही, याची त्यांना पूर्ण खात्री आहे! भाऊ म्हणून दोघे एकत्र आले, कुटुंबच्या कुटुंब एकत्र दिसायला लागली, हे सगळं ठीक आहे. पण, हा राजकीय देखावा किती आणि त्यात कुटुंबातल्या प्रेमाचा ओलावा किती? परस्परांविषयी विश्वास किती? मनसैनिकांना विचारा. मागच्या अनुभवांवरून त्यांचं आजही म्हणणं आहे, कधी-कुठे दगाफटका होईल, सांगता येत नाही. एकत्र येणं खरंच इतकं खरं असतं, तर जागावाटपाच्या चर्चेला इतकी लांबण लागलीच नसती. जागावाटपाच्या चर्चेत दोन्ही कुटुंबं एवढी गुंतली होती, की दोन्ही कुटुंबातल्या एकालाही नगरपालिका-नगर परिषद निवडणुकीसाठी प्रचाराला घराबाहेर पडता आलं नाही! या निवडणुका 'कार्यकर्त्यांच्या' म्हटल्या जातात. त्या निवडणुकीसाठी, कार्यकर्त्यांसाठी कोणा एकालाही थोडा वेळ काढता आला नाही. आता युतीची एकत्र गोष्ट झाली, पण जागावाटपाचं गुर्हाळ अजून संपलेलं नाही. जिथे मोठा गाजावाजा करूनही दोन भाऊ मनाने, विश्वासाने एक होऊ शकत नाहीत; तिथे पक्ष कधी विश्वासाने एकत्र येणार? सगळीकडे दोन भाऊ एकत्र आल्याची, कुटुंब एक झाल्याची चर्चा; पण पक्ष वेगवेगळेच राहणार असल्याची आणि व्यवहारात पुन्हा पूर्वीसारखंच कटकपट होण्याची शक्यता वर्तवली जाते आहे याचं कारण तेच आहे. सगळा आटापिटा आहे, तो मुंबई - ठाणे - पुणे - नाशिक- संभाजीनगरमधल्या मतांसाठी. तिथल्या मतदारांनी यांना मत का द्यावं? या प्रश्नाला यांच्याकडे उत्तर नाही. मराठी मतांच्या ध्रुवीकरणावर यांची सगळी भिस्त आहे. पण, दोघे एकत्र येऊनही ते शक्य नाही. कारण, यांच्याच कारकिर्दीत मुंबईची किती वाट लागली, नाशिकचं काय झालं ते मराठी माणसाने पाहिलं आहे. यांच्याच धोरणाने मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला गेला. ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांत ढकलला गेलेला मराठी माणूस तिथे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत आहे. मुंबईतले शिवसेनेचे निम्म्यापेक्षा जास्त माजी नगरसेवक, शाखाप्रमुख, गटप्रमुख शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मूळ शिवसेनेत आहेत. ज्यांच्या कार्यकर्तृत्वाने मुंबईतला मराठी टक्का घसरला, तिथे उर्वरित मराठी माणसाला आता स्वतःच्या अस्तित्वाची काळजी आहे. अडचणीला जो पक्ष आपल्या दाराशी येईल, अशा पक्षांकडेच मुंबईतला मतदार वळला आहे. त्याची हिंदू अस्मिता जागृत आहे. विविध प्रांतातून आलेल्या हिंदू बांधवांबरोबर तो कामधामाने जोडलेला आहे. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा, झारखंड... जिथून कुठून हिंदू बांधव मुंबईत आला, तो मुंबईत राहतो; पण त्याचं नातं त्याच्या मूळ प्रदेशातील भारतीय जनता पक्षाच्या राजवटीशी जोडलेलं आहे. मतदाराचे अनेक हितसंबंध असतात. वेगवेगळ्या कारणांनी त्याची राजकीय मतं तयार होत असतात. त्यातून तो मतदान करत असतो. त्या सगळ्या गणितात कुठल्या कुटुंबातलं कोण एकत्र आलं म्हणून किती टक्के फरक पडणार आहे? आजवरचा इतिहास काय आहे? तुम्ही लोकांसाठी, आपल्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी काय केलं? हा आहे. तिथे सारं शून्य आहे. त्यामुळे, अशा कितीही शून्यांची बेरीज केली, तरी त्याने काय होणार?**

# २३ जुलै चंद्रशेखर आझाद जयंती

भारताच्या स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले.यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते.त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे.चंद्रशेखर आझाद यांचा जन्म २३ जुलै १९०६ ला मध्यप्रदेशातील झाबुआ(अलिराजपूर)जिल्ह्यातील भावरा या गावी झाला.जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती.



त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले. परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती.चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती. १३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला व तळपायाची आग मस्तकात गेली.त्यानंतर चंद्रशेखर आझाद १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना अटकही झाली. अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला १२ फटक्यांची अमानुष शिक्षा दिली.चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते.परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले.

तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले.फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतीची ज्वाला प्रगट झाली आणि क्रांतिकारक झाले.आझाद यांचा क्रांतीकारी हेतू पहाता १९२२ साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली.क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले. इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली.चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते.भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत. अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते.

दिनांक २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला. इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला. अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात मोठा गोळीबार झाला.अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले.आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले.

अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले.भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी अल्पवयात आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला.त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून, घरांवर तुळशीपत्र ठेवून,आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी- समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता. आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण,भ्रष्टाचार, पेपर फुटी,रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना आणि विद्यार्थ्यांना करावा लागतो आहे.आज १४५ करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही. परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार - खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत करून ठेवली आहे.यामुळे हा पैसा १४५ कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य, शेतकरी व गरीब लोकांना भोगावा लागत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिले,आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत. यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!



लेखक : रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार )



# परळीत ६५ वर्षीय वृद्धाचा रेल्वे अपघाती मृत्यू

## सदरील वृद्ध हे गांधी चौक, नांदगाव नाशिक येथील रहिवाशी

■ **परळी (प्रतिनिधी)**

तिरुमला (तिरुपती) / शिर्डी रेल्वेने प्रवास करणाऱ्या एका वृद्ध प्रवाशाचा अज्ञात रेल्वेच्या अपघातामध्ये दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. परळी ते सिमेंट फॅक्टरीदरम्यान रेल्वे ट्रॅकच्या शेजारी या वृद्धाचा मृतदेह आढळून आला असून, भाऊ धर्माजी गवळी (वय ६५, रा. गांधी चौक, ता. नांदगाव, जि. नाशिक) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

प्राथमिक माहितीनुसार, भाऊ गवळी हे तिरुपती/शिर्डी रेल्वेने प्रवास करत होते. प्रवास दरम्यान त्यांचा अपघात नेमका कसा आणि कोणत्या परिस्थितीत झाला, याचे मूळ कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, परळीजवळील सिमेंट फॅक्टरी परिसरातील रेल्वे ट्रॅक शेजारी त्यांचा मृतदेह दिसून आला.

घटनेची बातमी समजताच परळी लोहमार्ग पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या दुर्दैवी घटनेचा पुढील तपास लोहमार्ग पोलीस स्टेशन परळीचे सहायक पोलीस निरीक्षक एस यु जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार खडके करत आहेत. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# निर्भीड पत्रकार संघाच्या परळी तालुका अध्यक्षपदी बालाजी ढगे, उपाध्यक्षपदी कृष्णा सरवदे

■ **पान १ वरुन**

शहराध्यक्ष जगन्नाथ खेत्री, माजलगाव तालुका उपाध्यक्ष शेख हमीद, माजलगाव तालुका सचिव शेख अलीम यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत संघटनेच्या आगामी वाटचालीबाबत, पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर तसेच संघटन बळकट करण्याच्या दृष्टीने सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित सर्व सदस्यांनी बालाजी ढगे आणि कृष्णा सरवदे यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

नवनियुक्त अध्यक्ष बालाजी ढगे यांनी संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, पत्रकारांमधील एकोपा वाढविणे आणि सामाजिक बांधिलकी जपत प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपाध्यक्ष कृष्णा सरवदे यांनीही संघटनेच्या ध्येय-धोरणांनुसार कार्य करून पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

बैठकीच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. या निवडीबद्दल बाला जी ढगे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# गुरूपौर्णिमेनिमित्त श्री बजरंगबली वेताळ मंदिरात महाआरती व महाप्रसादाचे आयोजन

■ परळी वैजनाथ

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी गुरुपौर्णिमेनिमित्त परळी येथील श्री बजरंगबली वेताळ मंदिर येथे बुधवार, दि. 29 जुलै 2026 रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

गुरूपौर्णिमेनिमित्त श्री बजरंगबली वेताळ मंदिरात भाविकांच्या उपस्थितीत गुरुपूजन, सामूहिक प्रार्थना, महाआरती आणि महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे. उत्सवानिमित्त दुपारी 12 ते 1 या वेळेत महाआरती



होणार असून, त्यानंतर दुपारी 1 ते 5 या वेळेत महाप्रसाद होणार आहे. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प.पू.विलासानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, मंदिराचे अध्यक्ष श्री. यू. के. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सर्व व्यवस्था करण्यात येत आहे. तरी सर्व भाविक-भक्तांनी श्री बजरंगबली वेताळ मंदिर येथे गुरूपौर्णिमा कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**परळी वैजनाथ**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस तसेच राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष, परळी शहराच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि. २२) श्रद्धा मंगल कार्यालय येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.





कार्यक्रमाचे उद्‌घाटन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष श्री. जुगलकिशोर लोहिया यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. जिल्हाध्यक्ष भाजयुमो नीळकंठजी चाटे, भाजपचे उपाध्यक्ष महादेव इटके, ज्येष्ठ नेते माऊली दादा आघाव, डॉ. शालिनीताई कराड, भाजप गटनेते प्रा. पवन मुंडे, नगरपरिषदेच्या सभापती अंजलीताई केशवराव माळी, ज्येष्ठ नगरसेविका जयश्रीताई शंकरअप्पा मोगरकर, नगरसेविका अश्विनीताई राहुल केंद्रे, डॉ. पूजा प्रितेश तोतला, मीराताई केशव नागरगोजे, वंदनाताई अश्विन आघाव, मा. प्रदेश उपाध्यक्ष श्री. अरुण पाठक, ज्येष्ठ नेते शेख खदीर साहब यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देत त्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या विविध शाळांतील शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या चित्रकला स्पर्धेचे आयोजन भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष श्री. सुशील हरंगुळे यांनी केले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नितीन समशेट्टे अश्विन मोगरकर. अनिस अग्रवाल. पवन मोदाणे. मोहन जोशी.बंडू नाना कोरे. दिलीप. नेहरकर योगेश पांडकर. वैजनाथ रेकणे. जितेंद्र मस्के. अनिस शेख. गोविंद चौरे.विराज गीते. दिनेश आंधळे. वैजनाथ ईटके. विकास हालगे. पवन तोडकरी. राम कुकर.महेश खोत. सोमनाथ राजनाळे.श्रीपाद शिंदे. योगेश मुंडे.नीरज कुसुमकर. कपिल कापसे. सखाराम डाके. प्रदीप पुजारी. संदीप बावगे.

# कॉमनवेल्थ गेम्स 2026 आजपासून: 125 भारतीय खेळाडू 8 खेळांमध्ये उतरतील

स्कॉटलंडमधील ग्लासगो शहरात आज 23व्या कॉमनवेल्थ गेम्सची सुरुवात होईल. 2 ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत 74 देशांतील 3,000 हून अधिक खेळाडू सहभागी होत आहेत. 10 खेळांमध्ये 215 सुवर्णपदकांसह एकूण 1,168 पदके पणाला लागतील.

भारताचे 125 खेळाडू 8 खेळांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करतील. कथेमध्ये कॉमनवेल्थ गेम्स 2026 शी संबंधित सर्व आवश्यक माहिती जाणून घ्या...




■ **कॉमनवेल्थ गेम्स कधी आणि कसे सुरू झाले?**

कॉमनवेल्थ गेम्सची सुरुवात 1930 मध्ये कॅनडातील हॅमिल्टन येथे झाली होती. तेव्हा याला ब्रिटिश एम्पायर गेम्स असे म्हटले जात होते. पहिल्या आवृत्तीत ब्रिटिश साम्राज्याशी संबंधित 11 देशांतील 400 हून अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता. यात ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, लॉन बॉल्स, रोइंग, स्विमिंग आणि रेसलिंग यांसारख्या खेळांचा समावेश होता.

1930 ते 1950 पर्यंत या स्पर्धेला ब्रिटिश एम्पायर गेम्स असे म्हटले जात होते. 1954 मध्ये त्याचे नाव बदलून ब्रिटिश एम्पायर अँड कॉमनवेल्थ गेम्स असे करण्यात आले. 1970 मध्ये ते ब्रिटिश कॉमनवेल्थ गेम्स बनले आणि 1978 पासून ते कॉमनवेल्थ गेम्स या नावाने ओळखले जाते. याचे आयोजन दर चार वर्षांनी होते. कॉमनवेल्थ देशांतील खेळाडूंना मोठ्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर स्पर्धेची संधी देणे हा याचा उद्देश आहे. भारताने पहिल्यांदा 1934 मध्ये भाग घेतला होता.

# जंतर-मंतरवरील लाठीहल्ल्याचा निषेधार्थ परळीत आज माकपची निदर्शने

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

**परळी | प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या अमानुष लाठीहल्ल्याचा निषेध करण्यासाठी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी गुरुवारी २३ जुलै २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रभरात तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत. त्याचाच भाग म्हणुन परळी तहसील कार्यालयावर निदर्शने करण्यात येणार आहेत.

जंतर-मंतर येथे आपल्या मागण्यांसाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्यां विद्यार्थ्यांवर पोलिस प्रशासनाने बळाचा वापर करत लाठीमार केला. या घटनेचे देशभरात तीव्र पडसाद उमटत आहेत. माकपने या लाठीहल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, शिक्षण क्षेत्रातील विविध मुद्द्यांवरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मुख्य मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर परळी तहसील कार्यालयावर माकपच्या वतीने गुरुवारी ता 23 सकाळी 11 वाजता तीव्र निदर्शने करण्यात येणार आहे. या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माकपचे शाखा सचिव कॉ किरण सावजी, कॉ पांडुरंग राठोड, अँड बी जी खाडे, कॉ परमेश्वर गित्ते, कॉ प्रकाश चव्हाण, कॉ जालिंदर गिरी आदींनी केले आहे.

# अंबाजोगाईत उमटले जंतरमंतरचे पडसाद : धर्मेंद्र प्रधान आणि सदाभाऊ खोत यांच्या पुतळ्याचे दहन

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) गटाचा आंदोलनातून इशारा

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ अंबाजोगाईत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) गटाच्या वतीने उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि सदाभाऊ खोत यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

यावेळी आंदोलनकर्ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) गटाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी निष्क्रिय केंद्र सरकारच्या आणि बेताल वक्तव्य करणाऱ्या सदाभाऊ खोत यांच्या प्रतिगामी भूमिकेवर जोरदार टीका करीत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ तात्काळ थांबविण्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारने संवेदनशील भूमिका घेत योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा आम्हाला आंदोलन अधिक तीव्र करावे लागेल, असा गर्भित इशाराही मराठवाडा विभागीय अध्यक्ष भुंबे यांनी यावेळी दिला. नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि संबंधित पेपरफुटी प्रकरणासह विद्यार्थ्यांवर अमानुषपणे लाठी हल्ला करणाऱ्यां जबाबदारांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, या मागण्यांसाठी आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलनकर्ते यांनी नरेंद्र मोदी शर्म करो, वरना डुब मरो, धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा झाला पाहिजे, विद्यार्थ्यांना आतंकवादी म्हणणाऱ्या सदा खोतचा जाहीर निषेध असा मजकूर लिहिलेले फलक झळकावून शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. या आंदोलनात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) गटाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे, अरूण बनसोडे, बादल तरकसे, गणेश उपाडे, शंकर उजगरे, नितीन गोदाम, बालासाहेब शेवाळे, प्रतिक वाघमारे यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.






दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, गुरुवार , 23 जुलै 2026




## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये त्वचारोग जनजागृती व्याख्यान संपन्न






**परळी (प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांमध्ये त्वचेच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी वैजनाथ येथे त्वचारोग जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मुंबईतील नामांकित केईएम (KEM) हॉस्पिटलचे माजी विद्यार्थी व एम.डी. त्वचाविकार तज्ज्ञ डॉ. रोहित हाडबे यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. रेड्डी लॅबोरेटरीचे प्रतिनिधी श्री. राजेश मेडपल्ली व श्री. व्यंकटेश शिर्शीकर तसेच शाळेचे प्राचार्य मा. श्री श्रीकांत पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.रोहित हाडबे व इतर मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

सदरील कार्यक्रमात शाळेचे प्राचार्य मा.श्री श्रीकांत पाटील सर यांनी आपल्या प्रस्ताविकातून आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमांचे नियमित आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये उत्तम आरोग्याविषयी जनजागृती करण्याचा उद्देश व्यक्त केला. याप्रसंगी उपस्थित असलेले डॉ. हाडबे यांनी त्वचेची योग्य निगा, वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व, बुरशीजन्य संसर्ग, त्वचेची ॲलर्जी, मुरुम, उन्हापासून त्वचेचे संरक्षण तसेच किशोरवयीन मुलांमध्ये आढळणाऱ्या विविध त्वचारोगांबाबत वैज्ञानिक माहिती दिली. कोणत्याही त्वचारोगाकडे दुर्लक्ष न करता वेळेवर तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सोशल मीडियावरील अपूर्ण माहिती किंवा घरगुती उपायांवर अवलंबून न राहता योग्य वैद्यकीय उपचार घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले.डॉ.हाडबे यांनी त्यांची समर्पक उत्तरे देत त्वचेचे आरोग्य जपण्यासाठी दैनंदिन जीवनातील चांगल्या सवयींचे महत्त्व अधोरेखित केले.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच आरोग्याविषयी सजग नागरिक घडविण्याच्या उद्देशाने दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलकडून राबविण्यात आलेल्या या उपक्रमास शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब (आय.ए.एस. ) मुख्यमंत्री सचिव : सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, उद्योग व वाणिज्य विभाग, त्रिपुरा सरकार , विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम व शाळेचे प्राचार्य मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.रूपाली सावंत मॅडम यांनी केले, याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचारी वर्गानेही या व्याख्यानाचा लाभ घेतला.

## नियम 81 चे उल्लंघन; परळी नगर परिषदेची सर्वसाधारण सभा अवैध – गटनेते सय्यद फारुख गणी बाबू

### आवश्यक कागदपत्रांशिवाय सभा घेऊन ठराव मंजूर; कलम 324 अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करणार असल्याची माहिती

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी नगर परिषद प्रशासनाने महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, १९६५ मधील नियम व तरतुदींचे पालन न करता आमदारांच्या नावाखाली हुकूमशाही पद्धतीने कारभार सुरू ठेवला असून, मंगळवार (दि. २२ जुलै २०२६) रोजी घेण्यात आलेली नगर परिषदेची सर्वसाधारण सभा ही पूर्णपणे अवैध असल्याचा आरोप काँग्रेसचे परळी नगर परिषदेचे गटनेते तथा नगरसेवक सय्यद फारुख गणी बाबू यांनी केला आहे.



त्यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, नगर परिषद अधिनियम, १९६५ मधील नियम ८१ नुसार सभेतील विषयांशी संबंधित आवश्यक कागदपत्रे सभासदांना आगाऊ उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. मात्र, या सभेसाठी केवळ विशेष विषयसूची देण्यात आली. संबंधित विषयांचे कच्चे मसुदे, सुधारित मसुदे (Revised Draft), डीपीआर (DPR), तसेच करोत्तर मान्यतेसाठी ठेवण्यात आलेल्या कामांची संपूर्ण माहिती सभासदांना देण्यात आली नाही.

यासंदर्भात दि. २० जुलै २०२६ रोजी नगराध्यक्ष, मुख्याधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन सर्व आवश्यक कागदपत्रांची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्याची कोणतीही दखल न घेता संबंधित माहिती न देता आजची सभा सुरू करण्यात आली, असा आरोप त्यांनी केला.

सभा सुरू होताच काँग्रेस गटाने नियम ८१ चा आधार घेत सभेला एक आठवड्यासाठी तहकूब करून सर्व आवश्यक कागदपत्रे सभासदांना उपलब्ध करून द्यावीत, जेणेकरून त्यांचा अभ्यास करून विषयांवर नियमानुसार चर्चा करता येईल, अशी मागणी केली. तसेच सभेत 'पॉईंट ऑफ ऑर्डर' उपस्थित करण्यात आला. नियमानुसार अध्यक्षांनी सर्वप्रथम त्या पॉईंट ऑफ ऑर्डरवर निर्णय देणे बंधनकारक असतानाही त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून सभा पुढे चालविण्यात आली आणि विविध ठराव मंजूर करण्यात आले, असा आरोपही सय्यद फारुख गणी बाबू यांनी केला.

नियमबाह्य पद्धतीने सभा घेऊन मंजूर करण्यात आलेले सर्व ठराव कायदेशीरदृष्ट्या अवैध असल्याचा दावा करत, या संपूर्ण प्रकरणाविरोधात महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, १९६५ मधील कलम ३२४ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील दाखल करण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेसचे परळी नगर परिषदेचे गटनेते सय्यद फारुख गणी बाबू यांनी दिली.

## देवेंद्रजी फडणवीस आणि पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांचा प्रारंभ

### निराधार व्यक्तींना अन्न वाटप




**परळी (प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजप परळी तालुक्याच्या वतीने २२ ते २६ जुलै दरम्यान विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सामाजिक सप्ताहाचा प्रारंभ बुधवारी (दि. २२) निराधार व्यक्तींना अन्न वाटप करून अत्यंत उत्साहात करण्यात आला.

भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी दिलेल्या माहितीनुसार, या सेवा सप्ताहांतर्गत रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. "नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे," असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अन्न वाटपाच्या या कार्यक्रमास भाजप प्रदेश सदस्य सतीश (भाऊ) मुंडे, भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते, तालुका उपाध्यक्ष सूर्यकांत मुंडे, दादाहरी वडगावचे सरपंच शिवाजी कुकर, सेलूचे सरपंच बाळासाहेब फड, कासारवाडीचे माजी सरपंच दशरथ (दादा) गुट्टे, मांडवा येथील भाजप नेते कारभारी (भाऊ) मुंडे, भाजप सचिव धनराज गित्ते, अनुसूचित जमाती मोर्चाचे तालुकाध्यक्ष महादेव कंडूकटले, युवा नेते नागनाथ मुंडे, वाल्मिक (भाऊ) मुंडे, माऊली आंधळे, भाऊसाहेब गित्ते, राजेभाऊ भांगे, सुभाष फड, बूथ प्रमुख गोपाळ केंद्रे, अरुण जिनझुर्डे आणि सायराट गरड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२६ जुलैपर्यंत चालणाऱ्या या सामाजिक सप्ताहात तालुक्यात विविध लोककल्याणकारी व सामाजिक उपक्रम राबवले जाणार आहेत.

## महिला महाविद्यालयांत स्व .अजीतदादा पवार यांची जयंती साजरी

**परळी | वर्ताहर**

येथील कै . लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व . अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यांत आली .

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख हे होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विद्या देशपांडे यांच्या उपस्थितीत व कुशल मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ विनोद जगतकर हे लाभले.

या कार्यक्रमात सर्वप्रथम स्व . अजितदादांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यांत आले. मान्यवरांच्या स्वागतानंतर कार्यक्रमाचे

प्रास्ताविक - डॉ.गुट्टे पी. व्ही. यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात स्व .अजीतदादांच्या जीवनांतील अनेक वैशिष्ट्ये सांगून कार्यक्रमाच्या औचित्याचा लेखाजोखा विशद केला.

प्रमुख वक्ते डॉ . विनोद जगतकर - यांनी आपल्या मनोगतात स्व . दादांच्या जीवनकार्याचा समग्र आढावा घेतला. दादा विक्रमी ६ वेळा उपमुख्यमंत्री तथा सर्वाधिक अर्थसंकल्प मांडणारे होते. अर्थमंत्री म्हणून दादांचा मोठा लौकिक होता असे ते म्हणाले. स्व . अजीतदादा शेवटपर्यंत आपल्या विचारावर कायम होते असे सांगून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू त्यांनी उलगडून दाखवले .

शेवटी अध्यक्षीय समारोप करताना कै ल. दे.शि.प्र.मंडळाचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख यांनी स्व .दादांच्या प्रशासनावरील असलेल्या नियंत्रणाचे , नेत्रदीपक राजकारणाचे व वेळेला अतिशय महत्त्व देणाऱ्या त्यांच्या नेतृत्वगुणांचे वर्णन केले .






या कार्यक्रमासाठी डॉ. राजकुमार जोशी डॉ.प्रवीण दिग्रसकर डॉ.गुळभिळे डॉ रागिणी पाध्ये मॅ डॉ. विवेकानंद कवडे डॉ. शरद रोडे प्रा. प्रवीण फुटके डॉ. श्याम नेरकर यांच्यासह सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थिनींची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ अरुण चव्हाण यांनी केले तर डॉ. राजकुमार जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.